**चांदी नदी प्रकल्प,**
**ता. नांदगांव (खं.), जि. अमरावती.**
**या योजनेस तृतीय सुधारीत प्रशासकीय**
**मान्यता प्रदान करणेबाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.**

**महामंडळाचा निर्णय क्र.: १२३** /विपाविम/कातां.७/(धा.क्र. १३६/२/२०२२)/चांदी नदी प्रकल्प सुप्रमा/ २०२२, दिनांक : **१४.७.२०२३**

**संदर्भ :** १. व्दितीय सुप्रमा महामंडळ निर्णय क्र.८७/विपाविम/कातां ७/(अ.क्र. ११६/२००९)/चांदी नदी प्रकल्प/२०१८, दि.०३.०४.२०१८
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
३. अधीक्षक अभियंता, रातांसस, नाशिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ कक्ष-१(मु) / चांदी नदी प्रकल्प /(धा.क्र.७९/२०२२) /१३/२०२३, दि. २४.०१.२०२३
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.२.६.२०२३ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२३/(३७/२०२३)/ लपा, दि. १३.६.२०२३
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९.६.२०२३ रोजी संपन्न ८३ व्या बैठकीतील मंजुर ठराव क्र. ८३/२४

**प्रस्तावना :**

चांदी नदी लघु पाटबंधारे प्रकल्प हा अमरावती जिल्ह्यातील गोदावरी खो-यातील वर्धा उपखो-यात नांदगांव (खं.) तालुक्यातील मुंडवाडा गावाजवळ चांदी नदीवर बांधण्यात येत आहे. हा प्रकल्प बेंबळा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्राअंतर्गत बळीराजा जलसंजीवनी योजनेमध्ये समाविष्ट आहे. सदर योजनेमुळे अमरावती जिल्ह्यातील नांदगांव (खं.) तालुक्यातील १२ गावांमधील १८३५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ उपलब्ध होणार आहे.

चांदी नदी लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. नांदगांव (खं.), जि. अमरावती या योजनेस शासन निर्णय क्र. लपात-२२०६/(२३६/०६)/लपा २, दिनांक २०.१२.२००६ अन्वये अंदाजित खर्च रु. ४८.१८ कोटी (दरसूची २००५-०६ वर आधारित) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तद्नंतर शासन निर्णय क्रमांक लपात-२२०९/(१७९/०९)/लपा-२, दि.१९.११.२०१० अन्वये रु. ११७.५६ कोटी (दरसुची २००८-०९ वर आधारित) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. तद्नंतर महामंडळ निर्णय क्रमांक.८७/विपाविम/कातां ७/(धा.क्र. ११६/२००९)/चांदी नदी प्रकल्प सुप्रमा/२०१८, दिनांक ३.४.२०१८ अन्वये रु. १५६.७६ कोटी (दरसूची २०१४-१५ वर आधारित) द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, भूसंपादन खर्चातील वाढ, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणांमुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्याने तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .